VOL. 4 | ISSUE 2 | FEB. 2018
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-550
IMPACT FACTOR: 4.197 (IIJIF

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**SPECIAL ISSUE**

On the Occasion of One Day International Conference On

# RECENT ADVANCES IN LANGUAGES, LITERATURE AND SOCIAL SCIENCES

17th February, 2018

**(BOOK- 3)**

*Guest Editors*

**Dr. Rajaram Sontakke**

**Prof. Ravindra Ahire**

ORGANIZED BY
MGEWS
**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN, DIST. THANE & NEW MAN INTERNATIONAL JOURNAL OF MULTI-DISCIPLINARY STUDIES, PARBHANI**
www.newmanpublication.com

Scanned with OKEN Scanner

## अनुक्रमणिका....


| | | |
|---|---|---|
| 1. मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीच्या बोलींचे स्वरूप व संकल्पना | डॉ. ललित दगडू अधाने | ०६ |
| 2. १९६० नंतरचे स्त्रीवादी साहित्य | प्रा. डॉ.गोपीनाथ पा. बोडखे | १० |
| 3. आदिवासी कादंबरीतील स्त्री जीवन | लोकडे सोनाली अशोकराव | १३ |
| 4. आदिवासी साहित्य – एक धावता आढावा | प्रा.स्मिता ओंकारराव माळवे | १६ |
| 5. मराठी ग्रामीण कादंबरीत आलेले सहकारी साखर कारखान्यातील भ्रष्टाचाराचे चित्रण | प्रा. विनायक जाधव | १९ |
| 6. भुजंग मेश्राम यांच्या कवितेतील सांस्कृतिक संघर्ष | प्रा.अरविंद आसाराम भराडे | २२ |
| 7. मराठी बोली भाषा अभ्यासाची परंपरा व महत्व | प्रा.डॉ. मीनाक्षी देव (निमकर) | २४ |
| 8. नव्वदोत्तरी मराठी कवितांवर जागतिकीकरणाचा प्रभाव | डॉ. आशा सोपानराव गिरी | २९ |
| 9. अभ्यासक्रमांतर्गत भाषेचे स्थान | डॉ. आशा म. धारस्कर–भावसार | ३१ |
| 10. दलित साहित्य : संकल्पना आणि दलित कादंबरी | डॉ. प्रीती किषोर उमाठे | ३४ |
| 11. नाट्यशास्त्र शिक्षणासाठी गुरूकुल परंपरा काळाची गरज...! | डॉ. मोनिका शांतीलाल ठक्कर | ३८ |
| 12. 'तृष्णा' या आदिवासी कादंबरीतून आलेला जीवनसंघर्ष | डॉ. प्रेमला मुखेडकर | ४३ |
| 13. "जैन साहित्यातून अभिव्यक्त होणारे शासन देवता अथवा यक्ष–यक्षिणी" | डॉ. महाजन पी.वी. | ४६ |
| 14. भटक्या विमुक्तांचे आत्मकथन | डॉ.गजानन जाधव | ४८ |
| 15. मराठवाड्याच्या ग्रामीण कथेतील बोली आणि कथेचे स्वरुप | डॉ.एल.डी.गलंडे | ५० |
| 16. दलित साहित्य नामकरणासंदर्भात | डॉ.अक्षय किषोर घोरपडे | ५२ |
| 17. ग्रामीण साहित्यातील वैश्विकता | डॉ. चौधरी एन. डी. | ५५ |
| 18. आदिवासी साहित्य समृध्द करण्यात लोकनृत्याचे योगदान | श्री. बाळू हिरामण घुटे | ५७ |
| 19. गझल : मराठी, मुस्लीम साहित्य प्रकार | प्रा. कल्पना कृ. जाधव | ६१ |
| 20. मराठी दलित आत्मकथनातील भाषिक वैशिष्ट्ये | डॉ. प्रकाश ज्ञानोबा जाधव | ६५ |
| 21. मराठी भाषा आणि साहित्य | डॉ. रंजना मधुकर कदम | ७० |
| 22. जागतिकीकरणाच्या प्रभावातील दलित कवी : अक्षय घोरपडे | डॉ.विजेंद्र विष्वनाथ पाटील | ७४ |
| 23. ग्रामीण कादंबरीतील दुष्काळाचे चित्रण | प्रा.डॉ.रामचंद्र झाडे | ७७ |
| 24. ग्रामिण साहित्य : प्रादेषिक कादंबरी | डॉ. अनिता प. खंडागळे | ७९ |
| 25. नारायण धारप यांच्या भयकादंबरी साहित्यातील भयाविष्कार | प्रा.अनिता महादेव भद्रे | ८२ |
| 26. 2000 नंतरची यशवंत मनोहर यांची कविता | डॉ.शिवसांब कापसे | ८६ |
| 27. उपेक्षितांच्या जीवनाचे मराठी साहित्यातील अभिव्यक्तिचे स्वरूप | प्रा.गणेश शिवाजी मारेवाड | ८८ |
| 28. बदलते ग्रामीण जीवन,साहित्य आणि जागतिकीकरण...! | डॉ.मधुकर गणेश मोकाशी | ९२ |
| 29. राघववेळ: मातंग समाजातील कुटुंबाची स्वविकसनाची कथा | प्रा.राहुल भगवान चव्हाण | ९८ |
| 30. ग्रामीण कादंबरीतील शोषिक स्त्री | डॉ. सतोष देशमुख | १०४ |
| 31. दलितांच्या उद्‌धारासाठी झालेल्या दलित चळवळी | प्रा.आर.एस्.शनवार | १०४ |
| 32. मराठी मुस्लीम वैचारिक चळवळ आणि साहित्य | शेख म. रफी म. युसूफ | १०४ |
| 33. गौळण : संताचा मनोरंजनातून समाजप्रबोधनाचा सांस्कृतीक अविष्कार | डॉ.मुंजाभाऊ बाबुराव धोंडगे | १०४ |




Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 34. स्त्रीवादी साहित्य | प्रा.वाडेकर छाया कि. | ११६ |
| 35. मराठी ग्रामीण कादंबरी आर्थिक स्तर रचना आणि भाषा | डॉ. ज्ञानेश्वर स. गवळीकर | ११९ |
| 36. मराठी ग्रामीण कादंबरी बदलते समाजजीवन | प्रा. डॉ. द.के. गंधारे | १२२ |
| 37. बहार वेदना कादंबरीतील भाषेचे स्वरूप | डॉ.एस.व्ही.गोरे | १२५ |
| 38. दलितांच्या लोकसाहित्यातील लोकजीवन | डॉ.मेघा गोसावी | १२७ |
| 39. दलित नाट्यातून डॉ. आंबेडकरांचा येणारा 'स्त्री' विषयक दृष्टिकोन | सोनाली लक्ष्मणराव इंगळे | १२८ |
| 40. ग्रामसंस्कृती व संस्काराचे दालन : बाप आणि पितृत्व | प्रा. मधुकर बालासाहेब जाधव | १३० |
| 41. गोलपिठा : देशी सांस्कृतिक संचित विस्तारणारी कविता | डॉ. गजानन भास्करराव जाधव | १३२ |
| 42. एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कादंबरी आणि कथा | डॉ. जगताप यु. एस. | १३५ |
| 43. 'आलोक' यातील विविध जाणिवा | प्रा. विद्या मनोहर कांबळे | १३८ |
| 44. मराठी भाषा आणि प्रसारमाध्यमे | प्रा. डॉ. संजय कांबळे<br>विष्णू शिवाजी कांबळे | १४२ |
| 45. दलित कादंबरीतील जीवनदर्शन | प्रा. राधाकिसन मुंढे | १४५ |
| 46. रत्नाकर मतकरीच्या नाट्यलेखनातील आशय : एक अभ्यास | प्रा.डॉ. चंद्रशेखर कणसे<br>प्रा. नीरज बोरसे | १४९ |
| 47. आदिवासी साहित्याचे आदिवासी जाती–जमातींच्या सामाजिक विकासात योगदान. | प्रा.पंकज केवळ पवार | १५२ |
| 48. भारतीय लोकसंगीत एक संक्षिप्त वर्णन | प्रा. सुनिल पटके | १५७ |
| 49. मराठी स्त्रीवादी लेखिकांचे कथालेखन | प्रा. अर्चना सोनवणे | १६० |
| 50. चारापाणी : शेतक–याच्या वेदनेचा हुंकार | प्रा. मुक्ता. एन. बिरादार | १६३ |
| 51. संत ज्ञानेश्वरांचे सामाजिक विचार | केशव सिताराम गोरे | १६७ |
| 52. मराठी साहित्यातील नवे प्रवाह – प्रवृत्ती : एक विचार | प्रा. राजरत्न किशन दवणे | १६९ |
| 53. स्त्रीवादी साहित्याची भूमिका व स्वरुप | प्रा.डॉ.राजाराम सोनटक्के | १७१ |
| 54. मराठी स्त्रीवादी कविता | डॉ. समिता जाधव | १७३ |
| 55. मराठी साहित्यातील आदिवासी आत्मकथने : एक अभ्यास विशेष संदर्भ – जेव्हा माणूस जागा होतो | अनिता ना. रानवळकर | १७९ |
| 56. वैष्णव संप्रदायातील वारकरी व दिंडी परंपरा | डॉ. भानुसे के.एल. | १८२ |
| 57. मावची भाषेतील म्हणी व कोंकणी भाषेतील उखाणे | प्रा.अहिरे रविंद्र महारू | १८५ |

45

# दलित कादंबरीतील जीवनदर्शन

प्रा. राधाकिसन पांडूरंग मुठे
अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर, ता. आंबेगाव, जि.पुणे
Mob No.8484036750

1960 नंतर मराठी वाङःमयात जे विविध प्रवाह निर्माण झाले. त्यापैकी महत्त्वाचा प्रवाह म्हणुन दलित प्रवाहाकडे बघितले जाते. दलित साहित्यप्रवाहाने प्रस्थापित मराठी साहित्य प्रवाहाला पुर्णतः वेगळया वळणावर नेऊन ठेवण्याचे काम केले. या साहित्यामध्ये ज्या दलित बांधवावर येथील वर्णव्यवस्थेने हजारो वर्ष पिढयांनपिढया ज्यांना माणुस म्हणुन नाकारले. गुलामगिरीमध्ये ढकलले. गावकुसाबाहेर अत्यंत पशुपातळीवरील जीवन जगावे लागले. अशा मानवी समुहांचा दुःख वेदनेचा हुंकार या दलित साहित्य प्रवाहाच्या माध्यमातुन शब्दबध्द होऊ लागला. सुरूवातीला मराठी साहित्य विश्वातील साहित्य समीक्षकांनी दलित साहित्य हे साहित्य नाही. म्हणुन नाकारले. परंतु दलित साहित्यातून व्यक्त होणारा अनुभव त्यातील शब्दकळा, त्यातील जाणीवा या जगण्याच्या पातळीवरच्या व वास्तव होत्या. त्यामुळे अल्पावधीतच दलित साहित्यांने प्रस्थापित मराठी वाङःमयाला आपली दखल घेण भाग पाडले. साहित्य समीक्षंकाना वाचकांना अंतर्मुख केले. आतापर्यंत केवळ मनोरंजन, काल्पनिक या परीघामध्ये अडकून पडलेल्या मराठी साहित्याला नवं परिणाम दिले यातुनच या दलित साहित्य प्रवाहाने मराठी साहित्य विश्वामध्ये आपले वेगळेपण सिद्ध केले सुरूवातीला कविता, कथा, आत्मचरित्र यांसारख्या वाङःमयीन प्रकारामध्ये विपुल प्रमाणात लेखन केले. परंतु तुलनेने कविता, कथा, आत्मचरीत्र या वाङःमयीन प्रकारापेक्षा दलित साहित्यामध्ये कांदबरी वाङःमयाचे लेखन लेखकांनी दलितांच्या जीवनाचे चित्रण आपल्या कांदब–यातुन कसे केले आहे. याचा विचार प्रस्तुत लेखात करावयाचा आहे. या कांदब–यामध्ये विशेषतः महार, मांग, चांभार, ढोर इ. जातीमधील जीवनदर्शन यांचे वास्तव स्वरूप काय आहे? विविध स्तंरातील दलितांचे जीवन–चित्राण करणा–या निवडक कांदब–यातुन दलित लेखकांनी दलित जीवनाची विविध रूपे कशी रेखाटली आहेत ती पुढीलप्रमाणे–

**'दलितांच्या गावकीच्या कामाचे व उदयोग व्यवसायाचे चित्रण** :– दलित कांदबरीकारांनी आपल्या कांदब–यामधुन काही प्रमाणात दलित समाजाला गावपातळीवर करावी लागणारी परंपरेने गावकीचे कामे त्यांचे स्वताःचे उदयोग व्यवसाय यांचेही चित्रण केले आहे. "श्राध्द"– उत्तम कांबळे यांची कांदबरी या कांदबरीमध्ये असणारा नायाक 'आबा' हा शिक्षणासाठी धडपडतांना दिसतो. परंतु वडील जुन्या वळणाचे असल्यामुळे त्यांना वाटे आपला मुलगा आबा याने महारांच्या नशिबी असणा–या गावकीच कामे करावीत असे त्यांना वाटे त्यामुळे लहानपणी शिक्षणाचे वेड घेतलेल्या आबाला पाटलाच्या वाडयावर चाकरीला ठेवलं जातं या सर्व प्रसंगाच चित्रण करतांना उत्तम कांबळे लिहितात. 'आबा एक एक दिवस मोठया कष्टांन काढु लागला सकाळी उठलं की शेणात हात घालायचा, दहा–वीस जनावरांचं शेण काढायचं भारभर कडबा तोडायचा, लाकडं फोडायची, गुरांचा गोठा साफ करायचा तसेच घरातील पडेल ते काम करायचं त्या मोबदल्यात मिळेल ते अन्न खायचं वरून पाटलाच्या शिव्या तसेच गावात एखादं जनावर मेलं तर ते ओढून नेऊन टाकायचे पन्नास–पन्नास मैल सांगावा घेऊन जायचं, अशा सर्व परिस्थितीत जीवनाचा त्याला तिरस्कार आला" या सर्व चित्रणावरून खेडयातील महारांना गावकीची सर्व प्रकाराची कामे कशी करावी लागतात हे जसे समजते. तसेच आर्थिक दुर्बलतेमुळे महारांच्या मुलांना शिक्षण देता येत नाही. बालवयातच त्यांना चाकरीला ठेवावे लागते. हे ही या प्रसंगातुन समजते.

**"छेद"**–:माधव कोंडविलकर यांनी या कांदबरीत चांभार लोक नव्या चपला करण्याचा व जुन्या चपला सांधुन देण्याचा व्यवसाय करीत या कांदबरीतले नायक ' जानु' हा रस्त्याच्या कडेला बसुन चप्पलला टाके मारीत होता. त्याच्या डोक्यावर छत्री होती. तरी त्याच्या अंगावर ऊन पडत होत घामानं त्याचं सारं अंग चिकचिकीत झालं होतं त्यावर रस्त्याची धुळ बसत होती. दिवसभर रस्त्याच्या बाजुला बसुन काम करून तो थकला होता. असे चित्रण करतात. यावरून ऊन, वारा, पाऊस याची पर्वा न करता अंत्यत हालाखीच्या परिस्थितीमध्ये पोटासाठी राबणा–या चांभारांची स्थिती आपल्या लक्षात येते. यावरून एक बाब प्रकर्षाने जाणवते. दलित जाती आपला परंपरागत व्यवसाय करून गावकीची सर्व प्रकाराची कामेही करतात. हे दिसुन येते. परंतु अहोरात्र कष्ट करूनही पोटभर सुखा समधानाने



Scanned with OKEN Scanner

खायला मिळु नये, दारिद्रय हटता हटु नये. ही दलित जीवनाची शोकांतिका दिसुन येते.

' **दलितांच्या ठिकाणी असणा–या श्रध्दा–अंधश्रध्दा, रूढी परंपरा यांचे चित्रण** दलित समाजातील सर्वच जातींमध्ये सर्वच जातींमध्ये विशिष्ट रूढी, परंपरा श्रध्दा–अंधश्रध्दा यांची जोपासना या समाजाकडून केली जाते. हिंदुधर्म आणि देवदेवता यांवर दलितांचा खुप विश्वास असल्याचे आपणास दिसुन येते त्यामुळे आपल्यावर येणारी संकटे दुःख यावर एकमेव औषध म्हणजे 'देव' आहे. दलित कांदबरीकारांनी दलितांच्या अशा प्रथा, परंपरा, श्रध्दा–अंधश्रध्दांचे चित्रण आपल्या कांदब–यातुन केले आहे.

" **सोमा** " ही बी. रंगराव यांची कांदबरी या कांदबरीतील 'नायक' 'सोमा' याच्या बहिणीला शांताला देवी होतात. ती आजारी पडते. तेव्हा रंगराव त्याचे चित्रण पुढीलप्रमाणे करतात. ' शांताच्या जळत्या अंगावर सर्वत्र लहान लहान पुटकुळया उमटल्या होत्या. मात्र तात्काळ समजली शांताला देवी निघाल्या होत्या' माय मरीआय माझं लेकरूं, ओटयात घे, काई दाखवु नको. माया लानलान लेकराईल माय उद्गारली शांताचे अंग रात्रभर जळत . होते. माय तिला पोटाशी घेऊन देवीला–मरीआयला विनवीत होती. सकाळपर्यन्त शांताचा आजार आणखीनच वाढला शांता नुसती तळमळत होती. सकाळी कडुनिंबांच्या फांदया आणुन अंथरूणावी पसरविल्या एका वेगळया फांदीने घरात सर्वत्र गोमुत्र शिंपडण्यात आले. घरात येणा–या प्रत्येक व्यक्तीच्या अंगावर फांदीने गोमुत्र शिंपडण्यात येत होते. भुलाबाई सकाळपासुन आळवीत होत्या शांताच्या उशाशी ऊद आणि उदबत्या जळत होत्या या सर्व प्रसंगातून, सुचित होते की आजारी पडल्यानंतर डॉक्टरांकडे न जाता देवदेवतांच त्यांना आधार घ्यावासा वाटतो. आपल्या तापाने फणफणणा–या लेकराची अहोरात्र सेवा करणा–या श्रध्दाळू आईचे दर्शन घडते.

**"मेलेलं पाणी"** अशोक व्हटकर यांच्या मेलेलं पाणी या कांदबरीत यल्लापा ढोराची बायको 'पाटी' चांगुबा देवरूषाकडे जाते व 'आपलं गा–हाणं त्याला सांगते.' ' देवा' आमच्याकडनं काम चुकलं का ते तरी आमाला सांगुन दया दर वर्सीला खालतीकडल्या देवालां मी कोंबडा देती आमुशा पुनवंला नारळ वाडावती, ताईबाईची जत्रा करती. कुटं कुटं म्हणुन चुकत न्हाय आसं का हुतंया आमुशापासनं नुसतं इप्रित होतं चाललंया जे चांगलं कराया जावावं तेज्यात माती पडती. जे करावं तेला आपेश येतं. आसं का व्हावं? कुणा चांडाळणीनं देव बिव घाटलाय का? तसं आसलं तर ते सांगा. त्यावर चांगुबा तुझ्यावर कुणीतरी करणी केली आहे. असे सांगतो व तिला सल्ला देतो तो असा हये बग, उगवतीकडं पाय करून निजु नगा पोराच्या गळयात लसणाची माळ घालं भर सांजला मुठभर मिरच्या, म्हव–या, हळद–कुंकु, वाळवल्या खोब–याची वाटी, पाच खारका, तीन लिंबु, दोन सुया, एक बिब्बा यवढं एका फडक्यात बांधुन हुंब–यावर पाच वेळा आपट अनं वडयांकडं न्हिवुन टाक समजलं? या सर्व प्रसंगातून स्पष्ट होते की, संकटातुन सुटकाचा मार्ग म्हणजे देव–देवर्षी करणे अशीच दलितांची मानसिकता बनलेली दिसुन येते. तसेच खेडयातील चांगुबा सारखे देवरूषी दलितांच्या या मानसिकतेचा फायदा घेताना दिसतात. म्हणुन व्हटकरांनी वरील कांदबरीत केलेले चित्रण वास्तवदर्शी वाटते.

" **काळगर्भ** " विजय शिरसट यांनी ' काळगर्भ ' या कांदबरीतुन दलित समाज विशिष्ट रूढी–प्रथा परंपरांचे पालन करतांना दिसतो. याचे चित्रण केले आहे. ते लिहितात ग्रामीण भागातील महार–मांग या दोन्ही समाजात काही प्रथा मोठया विचित्र चालत आलेल्या महाराच्या नवरदेवाने मांगवाडयासमोर घोडे हातात धरून पुढे जायचे एखादा महार बाहेरगावावरून घोडयावरून आला तरी मातंग वाडयासमोर तो घोडयावरून उतरत असे. एवढेच कोय पण महाराची प्रेतयात्रा मांग वस्ती समोरून जाऊ शकत नव्हती त्यांना त्या वस्तीला वळसा घालुन आपली प्रेत यात्रा न्यावी लागे. या चित्रणावरून ग्रामीण भागातील महार मांग या दोन्ही जातीतील संबंध सुचित होतात. तसेच महारांनी मातंगवाडयासमोर जायचे नाही. म्हणजेच मातंग हे महारापेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजतात. आपल्यापेक्षा खालच्या जातीतील लोकांनी आपल्या समोर वरचढपणा दाखवु नये असे त्यांना वाटते. खरे तर महार–मातंग या दोन्ही ही जाती या जाती वर्णव्यवस्थेमध्ये अस्पृश्य म्हणुनच गणल्या गेल्या परंतु त्यांच्यातही उच्च–नीचतेची भावना असल्याचे वरील चित्रणावरून लेखक स्पष्टपणे मांडतांना दिसतात.

कर्नाटकातील ब–याचशा गावात यल्लम्मा देवीचं प्रस्थं आहे. त्यामुळे या भागातील बहुतांशी महार मांग या जातीतील मुलीच्या डोक्यात जटा झाल्या तर त्यांना देवीला सोडण्याची प्रथा होती विठ्ठल महाराजांची थोरवी चंदा हिच्या डोक्यात असा जटा झाल्या होत्या म्हणून तिला देवीला सोडले होते 'या चंदाला देवीला का सोडलिस? या आबाच्या प्रश्नांवर चंदाची आई शालू मृगने 'आवं आयी' कशाला सोडतुया?देवीची अज्ञाच झाली बगादेवीचा हुकुम टाकून कसं चालेल? पोरगीला देवीला सोडली नाही तर देवी आपलं वाईट करेल अशी अंधश्रद्धा शालुच्या मनात होती. असे प्रकारचे चित्र उत्तम कांबळे करतात. याचित्रावरून कर्नाटकात यल्लम्मा



Scanned with OKEN Scanner

देवीचे ग्रस्त असलेले जसे समजते तसेच खेडयातील गरीब दलित स्त्रीयांनाच देवदासी बनावे लागते याचीही जाणीव होते. महार–मांगाच्या मुलीच्या डोक्यात जटा होण्याचे कारण दररोज केसांची योग्य देखभाल न केल्यामुळे अस्वच्छता राहील्यामुळे त्यांच्या केसांच्या गुंता वाढतो जेव्हा त्यांच्या हे लक्षात येते. जेव्हा देवीचा हुकुम झाला आहे. आता आपण मुलीला देवीला सोडले पाहिजे.नाहीतर देवीचा आपल्यावर कोप हारेईल अशी भिती मनामध्ये असते. असा या अद्धश्रद्धे पोटी कित्येक दलित मुलींना देवदासी बनावे लागलेले दिसून येते.

**दलितांवरील अन्याय अत्याचाराचे चित्रण** दलित कादंबरीकारांनी आपल्या कांदब–यातुन दलितांवर होण–या अन्याय, अत्याचाराचे ही चित्रण केले आहे स्पृश्यवर्णीय लोक अस्पृश्यांवर नेहमीच त्यांना हिन लेखुन अत्याचार करीत असतात. दलितांची चूक असो वा नसो त्यांना स्पश्यवर्णीयांकडून केला. जाणारा अन्याय निमुटपणे सहन करावा लागतो. या संदर्भातील पुढील कादंबरी 'कल्लोळ' दि.रा. वाघमारे यांची ही कांदबरी या कांदबरीतील आनंदराव पाटील चांभाराच सभ्या आपल्या मुलीकडे सारजाकडे बघुन हासला म्हणून त्यांच्यावर खवळुन उठतो ज्याला गेलेला संभ्या तीनचार महिन्यानंतर गावात येतो. तो आल्याचा सुगावा लागताच आनंदराव पाटील सा–या गावाला जमा करून संभ्या या चांभाराला बेदम चोपतो व कडब्याच्या गंजीत फेकून तिला आग लावतो. यावरून महार – चांभार इत्यादी अस्पृश्यांनी आपल्या पायरीनेच वागावे, वरिष्ठ वर्गीयाकडे बरोबरीच्या भावनेने पाहु नये. त्यांच्या वागणुकीतुन तसे दिसुन आले तर त्यांना राग आल्यावाचुन राहात नाही. हे दिसून येते. हे परखड वास्तव लेखक येथे मांडताता दिसतात. 'अजून उजाडायचं आहे'

माधव कोंडविलकर यांच्या या कादंबरीतील देवजीचे वडील गावातील पर्शा त्यांच्या तोंडावर वहाण फेकुन मारतो. देवजीचे वडील गावासमोर न्यायासाठी हात पसरतात. पण त्याच्या बाजूने कुणीही साक्षीपुरावे देत नाही बाळू वाण्याच्या दुकाना समोर हा प्रकार घडला होता. पण बाळुही मी काय बघितले नाही. असे म्हणून हात झाडून मोकळा होतो. या चित्रणावरून अस्पृश्य व्यक्ती निरपराध असला गावकरी सदैव बाजू घेणार ती संवर्ण व्यक्तीचीच अशी जणू गावराहाटी असल्याचे दर्शन घडते. 'दे दान सुटे गि–हाण'

ना. वं. जाधव यांनी या कादंबरीत शैक्षणिक क्षेत्रातील दलितांवर होणा–या अन्यायाचे चित्रण केले आहे. या कादंबरीतील श्रीरंगला एन.एस. मध्ये ॲडमिशन नाकारली जाते. त्याचे मार्क्स त्याचे शैक्षणिक रेकॉर्ड लक्षात न घेता त्याच्यापेक्षा कमी मार्क्स असलेल्या रंजना सरकार या मुलीला तिच्या वडिलांचा वशिला असल्यामुळे प्रवेश दिला जातो. लेखक लिहितो मेडिकल कॉलेजमध्ये परीक्षेला बसणा–या अनुसुचित जाती –जनजाती या वर्गाच्या उमेदवारास उत्तरपत्रिकेवर आपल्या जातीचा उल्लेख अनिवार्य आहे का? तर उत्तरपत्रिका तपासणा–या या मुलांचा गळा कापता यावा म्हणून गेल्या वर्षी या परीक्षेत एकही विद्यार्थी उत्तीर्ण झाला नाही मॅट्रिकच्या परीक्षेत प्रथम श्रेणीत पास होणारा या परीक्षेत सपशेल नापास?या वर्गाकरता राखून ठेवलेल्या जागा पुन्हा संवर्ण हिंन्दुना मिळाल्या म्हणून? मागासलेल्या जातीच्या उध्दाराचा हा येळकोट पाहुन श्रीरंगच्या मनात तीव्र क्षोभ उठला. या चित्रणवरून शिक्षणच्या सारख्या पवित्र क्षेत्रावरही दलितांवर कशा प्रकारे अन्याय केला जातो. त्यांच्या गुणवत्तेकडे कानाडोळा करून वशिलेबाजी कशी केली जाते. यांचे दर्शन घडते. ना.व.जाधव यांनी केलेले चित्रण वास्तव वाटते.

**जातीयतेचे चित्रण** – दलितपणामुळे ज्यांचा छळ होतो असा अस्पृश्य वर्ग दलितांमध्ये मोठया प्रमाणात आहे. अस्पृश्य वर्गाने उच्चवर्गीय तीन वर्गांची हलकीसलकी कामे करून आपले जीवन जगण्याचा प्रयत्न केला. तरीही श्रमविभागणीकडे व त्यांचा वाटयाला आलेल्या हीन कामांमुळे उच्चवर्गीयांनी अस्पृश्यांना दुर ठेवले, दैनंदिन जीवनात शिवाशिव पाळली याचे चित्रण काही दलित कादंब–यातून पहावयास मिळते.

**'श्राध्द'** उत्तम कांबळे यांनी या कादंबरीत असणा–या सदा महाराचे किराणा दुकान असते. ' गावातलं गि–हाईक येतं ना? असे आबा त्यास विचारतो तेव्हा सदा म्हणतो 'धनगरांची, वडाराची गि–हाईक येतात. परवा जैनाची बाई गुळ न्यायला आली होती. त्याबाईनं दुरूनच पैसं फेकलं गूळ माझ्या हातातून घेतला नाही. मी बाकावर ठेवला आणि मग तिनं तो घेतला. या प्रसंगावरून महाराच्या हातचे संवर्णीय काही घेत नसत हे दिसून येते.

" **72 मैल**" अशोक व्हटकर यांच्या कादंबरीतील दहा–बारा वर्षाच्या अशोकला शिवाशिवीचा आलेला अनुभव अंगावर काटा आणणा आहे. एकदा वाण्याच्या बैलगाडीत अशोक बसतो बोलता बोलता गाडीवान त्याची जात विचारतो यो ढोराचा आहे हे समजल्यावर संतापतो. व्हटकर लिहितात. 'इंगळी डसावी तसा तो माणूस जागचा हालला. गर्रकन मान बळवून आणि पूर्वापासून विरक्तीने भारलेली अशी नजर विस्कारून तो माझ्याकडे पाहू लागला. फसवणुक, अपमान वगैरे भावनांनी त्याचा चेहरा क्षणार्धात पालटला. हिंस्त्र झाला. आणि 'तुझ्यायचं



Scanned with OKEN Scanner

ISSN: 2454-5503 Impact Factor 4.197 (IIJIF)

तुझ्या ढोरा........कडू' म्हणत त्याने बावकड्याला पाठ लावून पायात जोर आणला......... ज्याची प्रतिक्रिया, त्याची शिवी समजाच्या आत त्या माणसाची लाथ माझ्या मांडीवर अशा जोरदार बसली की, पुढे चालत्या गाडीतून मी मागे उडून पडलो आणि क्षणार्धात रस्त्यावर आडवा झालो...... मी गडबडीने उठू लागलो. ती बैलगाडी थांबली होती. आणि तिथून तो चाबुक घेऊन उतरत होता.

ढुंगण चांगलेच शेकले होते. कानशिलाची एक बाजू चिंबुन गेल्यासारख्या अवस्थेते गार लागून झणझणत होते. काय घडले, काय झाले हे माझ्या पोर बुध्दीला समजायच्या आतच त्याच्या हातातील उगारलेला चाबुक पाहूण माझा थरकाप उडला मला त्याने उठून दिले नाही.अंगावर चाबकाच्या ओल्या वादीचे कडाडा तडाके बसू लागताच मी किंचाळू लागलो रसत्यावर मी गडबडा लोळत होतो. तो माणूस मला उथ्थ्या आडव्या चाबकाने फोडू लागला, 'रांडच्या........ बा–या बोडयाच्या ..........ढोराची अवलाद शिवाशिव केलीस रामधरमाच्या पा–यात ...... .आयचं ढोपार तुझ्या वगैरे शिव्या आणि त्यासरशी वादीचा तडाका अंगावर उठू लागला. अशाप्रकारे खेडयातील स्वतःला परिष्ठ म्हणवून घेणा–या जाती कनिष्ठ, खलच्या जातीतील लोकांचा स्पर्शाही करून घेत नाहीस. दहा बारा वर्षाचे पोरवय असलेल्या अशोकला सवर्गीयाचाआलेला हा अनुभव थरारून टाकणारा आहे.

खेडयामध्ये अजूनही तीव्र स्वरूपात जातिभेद पाळले जातात. ग्रामीण समाजव्यवस्थेत जातीला फार महत्व असते. स्वातंत्र्य मिळाले. खेडयात बदल होऊ लागले दलितांची बलुतेदारी नाहीशी होऊ लागली. कायदयाने अस्पृश्यतेवर, बंदी आणली गेली पण जुन्या चालीरीतींची पकड मात्र पूर्वी इतकीच घट्ट असल्याचे आजही दिसून येते. आजही खेडयातील माणसे एकवेळ अस्पृश्य समजल्या जाणा–या जातीतील माणसांशी आपुलकीने वागतील, त्यांना मदत करतील. परंतू आपल्या बरोबरीचे मानणार नाहीत. ज्याने त्याने आपल्या पायरीनेच राहावे राहाने असे त्यांचे म्हणने याचे प्रत्यंतर उत्तम कांबळे, अशोक व्हटकर इत्यादी कादंबरीकारांच्या दलित" कादंब–यातून दिसून येते.

दलित कादंबरीमध्ये महार, मांग , चांभार, ढोर, देवसाची आदिवासी, तमासगीर, वेश्या, मुरळी, फासेपारधी, मसणजोगी अनाथ, झोपडपटटी जीवन, भटक्या विमुक्तांचे जीवन इत्यादी विविध स्तरातील दलितांच्या जीवनाचे दर्शन घडते. दलितांच्या घरादाराचे व त्यांच्या राहाणीमानाचे चित्रण, दलितांचे जीवघेणे दारिद्रय दलितांच्या जीवनातील रूढी प्रथा – परंपरा आणि अंधश्रध्दा, दालितांची दुःख, त्यांच्यावर [illegible] अत्याचार प्रस्थापित [illegible] मनात खदखदणारा विद्रोह, अस्पृश्य [illegible] दलितांना मिळणारी वागणूक व [illegible] समाजातील जातीभेदाचा [illegible] दलित जाती अंतर्गत असणारी [illegible] अशा विविधांगांनी दलित कादंबरीकारांनी दलित जीवनाचा वेध घेतलेला दिसून येतो. प्रस्तुत [illegible] निबंधातून या दलित जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न या निवडक कादंब–याच्या आधारे केलेला आहे.

## संदर्भ ग्रंथ


१. माधव कोंडविलंकर – 'छंद' प्रचार प्रकाशन कोल्हापूर 1982
२. बी. रंगराव – 'सोमा' प्रचार प्रकाशन, कोल्हापूर 1987
३. अशोक व्हटकर– 'मेलेलं पाणी'
४. विजय सिरसट– 'काळगर्भ ' प्रतिमा प्रकाशन, पुणे 1990
५. अशोक व्हटकर–'मेलेलं पाणी' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
६. वैजनाथ कळसे– 'तीन भिंती' मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई 1990
७. दि.रा.वाघमारे–'कल्लोळ' निर्मल प्रकाशन नांदेड 1987
८. माधव कोंडविलकर–'आजून [illegible]' मॅजेस्टिक बुक स्टॉल मुंबई
९. ना.बं. जाधव–'दे दान सुटे गि–हाण' मंगल प्रकाशन नागपूर
१०. उत्तम कांबळे– 'श्राध्द' चंद्रकांत शेट्ये प्रकाशन मंदिर कोल्हापूर
११. अशोक व्हटकर– '72 मैलं' मुंबई [illegible]
१२. भालचंद्र फडके– दलित साहित्य [illegible] श्रीविधा प्रकाशन पुणे


θθθ



Scanned with OKEN Scanner